699

महाराष्ट्र शासन

क्र.जमीन-२६१३/प्र.क्र.१०१/ज-३,

महसूल व वन विभाग,
जागतिक व्यापार केंद्र,
सेंटर १ इमारत, ३२ वा मजला,
कफ परेड, मुंबई-४००००५.
दिनांक- २४ डिसेंबर, २०१३.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा
27 DEC 2013
27357
E 27112
III-D

**विषय:-** **जमीन- मुंबई उपनगर जिल्हा**
मौ. मालवणी-मालाड (पश्चिम), अंबोजवाडी, ता. बोरीवली
येथील स.नं. २६५ पै. न.भू.क्र. ३५५६मधील जमिनीचा विद्युत उपकेंद्र
बांधण्यासाठी आगाऊ ताबा देणेबाबत.
**मे. टाटा पॉवर कंपनी लि. यांची विनंती.**

**ज्ञापन** :- जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना त्यांचे पत्र क्र. सी/ कार्या- ३ डी/कावि/८१/२०१३, दिनांक २२.११.२०१३ ला अनुलक्षून असे कळविण्यात येते की, मौ. मालवणी-मालाड (पश्चिम), अंबोजवाडी, ता. बोरीवली येथील स.नं. २६३ पै. न.भू.क्र. २८४१ मधील ६.०० मी. x ५.५ मी. = ३३.०० चौ.मी व स.नं.२६५पै. न.भू.क्र.३५५६ मधील ९.०० मी X ८.०० मी. = ७२.०० चौ.मी. या शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा मे. टाटा पॉपर कंपनी लि. यांना देण्यास काही अटी व शर्तीच्या पुर्ततेच्या अधिन राहून विशेष बाब म्हणून शासनाची मान्यता, शासन ज्ञापन महसूल व वन विभाग, सम क्रमांक, दिनांक ३.१०.२०१३ आणि शासन शुध्दीपत्रक, समक्रमांक, दिनांक २३.१०.२०१३ अन्वये देण्यात आली आहे.

तथापि, स.न.२६३ पै, न.भू.क्र.२८४१ हे क्षेत्र कांदळवनाने बाधीत असल्याचे आढळून आल्याने त्या ऐवजी स.न. २६५ पै. न.भू.क्र.३५५६ मधील वर नमूद केलेल्या ७२ चौ.मी. क्षेत्राव्यतिरिक्त ६.०० मी.X ५.५मी. = ३३ चौ.मी. जमिनीचा आगाऊ ताबा वर उल्लेखलेले दिनांक ३.१०.२०१३ रोजीचे ज्ञापन व दिनांक २३.१०.२०१३ रोजीचे शुध्दीपत्रक या मधील आदेश अंशत: अधिक्रमित करुन विद्युत, उपकेंद्र उभारणी करिता पुढे नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून एक विशेष बाब म्हणून मेसर्स टाटा पॉवर कंपनी यांना देण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती** :-

१) जमिनीची मालकी शासनाचीच राहील. भाडेपट्टाधारकाचा त्यावर कोणत्याही प्रकारचा अधिकार राहणार नाही.
२) जमीन ज्या प्रयोजनाकरीता प्रदान केली आहे, त्याच प्रयोजनाकरीता जमिनीचा वापर करावा लागेल.
३) कोणत्याही परिस्थितीत सीआरझेड विषयक नियमांचा भंग होणार नाही याची दक्षता संबंधित वीज कंपनीने घेणे बंधनकारक राहील. तसेच मागणी केलेली जमीन कांदळवनाव्यतिरिक्त तसेच आरक्षणाखालील क्षेत्र वजा जाता व वाटपास निर्बाध्यरित्या उपलब्ध असलेल्या क्षेत्रापैकी असल्याबाबत व सदर ठिकाणी विद्युत सब स्टेशन अनुज्ञेय असल्याबाबत जिल्हाधिकारी यांनी खातरजमा करुनच कंपनीस जमिनीचा आगाऊ ताबा द्यावा.



Scanned by CamScanner

४) अधिकृत झोपडपट्टीधारकांनाच वीज पुरवठा करणे व वीजपुरवठा करण्याबाबत शासनाच्या नियमांचे पालन करणे कंपनीवर बंधनकारक राहील.

५) विद्युत सब स्टेशन बांधण्याकरिता बृहन्मुंबई महानगर पालिका व सक्षम प्राधिकरणांची तसेच सीआरझेड बाबत पर्यावरण विभागाची पूर्वमंजुरी घेण्याची जबाबदारी संबंधित विद्युत कंपनीची राहील. याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी खात्री करावी.

६) प्रश्नाधीन जमीन कंपनीस अंतिमत: भाडेपट्टयाने मंजूर करताना ज्या अटी व शर्ती घालण्यात येतील, त्या कंपनीवर बंधनकारक राहतील.

७) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी कंपनीकडून सदर जमिनीचे अनुज्ञेय होणारे प्रचलित नियमानुसार भुईभाडे वसूल करण्याची कार्यवाही करावी.

८) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना आवश्यक वाटतील अशा इतर अटी व शर्ती.

९) वरील सर्व अटी व शर्ती मंजूर असल्याबाबत, प्रश्नांकित जमिनीचा प्रत्यक्षात आगाऊ ताबा देण्यापुर्वी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडे संबंधित विद्युत कंपनीस रु.२००/- च्या मुद्रांक कागदावर हमीपत्र द्यावे लागेल.

सदर जमीन ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने उक्त कंपनीस मंजूर करणेबाबत विहित कार्यपध्दतींचा अवलंब करुन अंतिम निर्णय घेण्यासंदर्भाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( अ.ज्ञा.होमकर )
**शासनाचे अवर सचिव**

प्रति

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत, १० वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

प्रतिलिपी -
१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई.
२) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई-४०० ००१.
३) जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा, प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व),मुंबई-५१.
४) सहाय्यक संचालक, नगररचना व मुल्यनिर्धारण, मुंबई उपनगर जिल्हा.
५) टाटा पॉवर कं. लि., इस्टेट डिपार्टमेंट, धारावी रिसिविंग स्टेशन, माटुंगा, मुंबई-१९.
६) प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर .
८) निवड नस्ती (कार्यासन ज-३ ), महसूल व वन विभाग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १ इमारत, ३२ वा मजला, कफ परेड, मुंबई-४०० ००५.

Scanned by CamScanner

(707)

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

क्र. :-सी/कार्या-३डी/कावि-८१/२०१३. ८६९
दिनांक :- 27 DEC 2013

प्रति,

व्यवस्थापक,
मे.टाटा पॉवर कंपनी लि.,
इस्टेट डिपार्टमेंट, धारावी रिसिविंग स्टेशन,
माटुंगा, मुंबई - ४०००१९.

विषय :- जमिन - मुंबई उपनगर जिल्हा
मौजे मालवणी - मालाड (पश्चिम), अंबोजवाडी, ता.बोरीवली येथील स.नं.२६५पै, न.भू.क्र.३५५६ मधील जमिनींचा विद्युत उपकेंद्र बांधण्यासाठी आगाऊ ताबा देणेबाबत.

संदर्भ :- १) शासन महसूल व वन विभाग ज्ञापन क्र. जमीन-२६१३/प्र.क्र. १०१/ज-३ दिनांक ०३/१०/२०१३ व शुध्दीपत्रक दि.२३/१०/२०१३.
२) या कार्यालयाचे सम क्रमांकाचे दि.३१/१०/२०१३ चे पत्र.
३) शासन महसूल व वन विभाग ज्ञापन क्र. जमीन-२६१३/प्र.क्र. १०१ /ज-३ दिनांक २४/१२/२०१३

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी शासन महसूल व वन विभाग यांनी संदर्भात नमुद क्र. १ चे ज्ञापन क्र. जमीन-२६१३/प्र.क्र.१०१ /ज-३ दिनांक ०३/१०/२०१३ व शुध्दीपत्रक दि.२३/१०/२०१३ नुसार मौजे मालवणी-मालाड, अंबोजवाडी, तालका बोरीवली येथील स.नं.२६३पै, न.भू.क्र.२८४१ मधील ६.०० मी. X ५.५ मी. = ३३.०० चौ.मी. व स.नं.२६५पै, न.भू.क्र.३५५६ मधील ९.०० मी. X ८.०० मी. = ७२.०० चौ.मी. या शासकीय जमीनीवर विद्युत उपकेंद्र बांधण्याकरीता मंजुर जमिनीचे अनुज्ञेय होणारे प्रचलित नियमानुसार भाडेपट्टा आकारुन तो वसुल करण्याचे अटीवर व इतर अटी/ शर्तीवर जमीनीचा आगाऊ ताबा कंपनीस देण्यास मंजूरी देण्यास मान्यता होती. प्रकरणी या कार्यालयाने शासन अटी व शर्तीस अधिन राहून, मंजूर दोन सब-स्टेशनचे जमीनीकरीता शिघ्र सिध्द गणकाप्रमाणे प्रचलित बाजारभावानुसार होणारी वार्षिक भाडेपट्टा रक्कम रु.२,३२,८२३/- आकारुन आगाऊ ताबा मे.टाटा पॉवर्स कंपनी लि. यांना देण्याबाबत संदर्भांकीत क्र.२ नुसार मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार मे.टाटा पॉवर कंपनीने वार्षिक भाडेपट्टयाची रक्कम रु.२,३२,८२३/- शासन जमा केलेली आहे.

तथापी, शासन महसूल व वन विभाग यांनी संदर्भात नमुद क्र.३ चे ज्ञापन क्र.जमीन-२६१३/प्र.क्र.१०१/ज-३ दि.२४/१२/२०१३ नुसार मौजे मालवणी स.नं.२६३पै, न.भू.क्र.२८४१ हे क्षेत्र कांदळवनाने



Scanned by CamScanner

बाधील असल्याचे आढळून आल्याने, त्या ऐवजी स.नं. २६५पै, न.भू.क्र.३५५६ मधील ७२ चौ.मी. क्षेत्राव्यतिरिक्त ६.०० मी. X ५.५ मी. = ३३.०० चौ.मी. जमिनीचा आगाऊ ताबा सदर प्रकरणी शासनाने पारित केलेल्या ज्ञापन दि.०३/१०/२०१३ व शुध्दीपत्रक दि.२३/१०/२०१३ या मधील आदेश अंशतः अधिक्रमित करुन विद्युत उपकेंद्र उभारणी करण्यास अटी व शर्तीवर एक विशेष बाब म्हणून मे. टाटा पॉवर कंपनीला आगाऊ ताबा देण्यास मान्यता दिलेली आहे. प्रस्तुत ज्ञापनातील अटी व शर्तीस अधिन राहून तसेच या कार्यालयाचे संदर्भांकीत क्र.२ चे पत्र अंशतः अधिक्रमित करुन खालील अन्य अटी व शर्तीवर मंजुर जमीनीचा आगाऊ ताबा देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**अटी/शर्ती :**

१) प्रस्तुत जमीनीची शिघ्र सिध्दगणकाप्रमाणे प्रचलीत बाजारभावानुसार वार्षिक भाडेपट्ट्याची रक्कम रु.२,३२,८२३/- या पुर्वीच मे. टाटा पॉवर कंपनीने शासन जमा केली असल्यामुळे पुन्हा रक्कम भरणां करणेची आवश्यकता नाही.

२) विद्युत उपकेंद्रासाठी भाडेपट्ट्याने मंजुर केलेल्या जमीनीची मालकी शासनाचीच राहील. भाडेपट्टाधारकाचा त्यावर कोणत्याही प्रकारचा अधिकार राहणार नाही.

३) जमीन ज्या प्रयोजनाकरीता प्रदान केली आहे. त्याच प्रयोजनाकरीता जमिनीचा वापर करावा लागेल.

४) कोणत्याही परिस्थितीत सी.आर.झेड. विषयक नियमांचा भंग होणार नाही याची दक्षता मे.टाटा पॉवर कंपनीने घेणे बंधनकारक आहे.

५) कंपनीने विद्युत सब स्टेशन करीता मागणी केलेली जमीन कांदळवनाव्यतिरिक्त तसेच आरक्षणाखालील क्षेत्र वजा जाता ती बाटपास निर्बाध्यरित्या उपलब्ध असलेल्या क्षेत्रा पैकी असल्याबाबत व सदर ठिकाणी विद्युत सब स्टेशन अनुज्ञेय असलयाबाबतची खातरजमा करुनच कंपनीस जमिनीचा आगाऊ ताबा द्यावा.

६) भाडेपट्टयाचे मंजुर जागेवर बांधण्यात येणा-या विद्युत सब-स्टेशन व्दारे अधिकृत झोपडीधारकांनाच वीज पुरवठा करण्यात यावा. वीजपुरठा करण्याबाबत शासनाच्या नियमांचे पालन करणे कंपनीवर बंधनकारक राहील.

७) विद्युत सब स्टेशन बांधण्याकरिता बृहन्मुंबई महानगर पालिका व सक्षम प्राधिकरणांची तसेच सी.आर.झेड. बाबत पर्यावरण विभागाची पूर्व मंजूरी घेण्याची जबाबदारी भाडेपट्टेदार कंपनीची राहील. त्यांचे पूर्वमान्यतेशिवाय कोणतेही बांधकाम करता येणार नाही.

८) प्रश्नांधीन जमीन भाडेपट्टेदार कंपनीस अंतिमतः भाडेपट्टयाने मंजूर करताना ज्या अटी व शर्ती घालण्यात येतील, त्या अटी व शर्ती कंपनीवर बंधनकारक राहतील.



Scanned by CamScanner

70

९) शासनाच्या/जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्या पूर्व परवानगी शिवाय सदर भूखंडाची विक्री/हस्तांतरण करता येणार नाही.

१०) प्रश्नांकीत जमिनीचा आगाऊ ताबा घेण्यापूर्वी वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु.२००/- च्या मुद्रांक कागदावर हमीपत्र आगाऊ ताबा घेण्यापूर्वी या कार्यालयात सादर करावे.

स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही असे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

**प्रत :** १) मा.अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १ इमारत, ३२ वा मजला, कफ परेड, मुंबई - ४००००५ यांना त्यांचे कडील ज्ञापक क्र.जमीन-२६१३/प्र.क्र.१०१/ज-३ दि.२४/१२/२०१३ नुसार माहितीकरीता सविनय सादर.

२) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई यांना माहिती करीता सविनय सादर.

३) जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे रवाना.

२/- शासन ज्ञापन दि.२४/१२/२०१३ मधील अट क्र. ३ व ५ मध्ये नमुदकेल्या नुसार (सोबत प्रत) तात्काळ कारवाई करुन संबंधीतांस आवश्यक त्या सुचना देण्यात याव्यात.

४) तहसिलदार बोरीवली यांचे कडे रवाना.

२/- त्यांनी प्रश्नांकीत मिळकतीचा आगाऊ ताबा देतांना नगर भूमापन अधिकारी, गोरेगाव यांचे समवेत मंजुर जागेचा आगाऊ ताबा देणेबाबतची कार्यवाही करावी.

५) नगर भुमापन अधिकारी गोरेगांव यांचे कडे रवाना.

२/- शासन आदेशातील अट क्र.३ व ५ नुसार मागणी केलेली जमीन कांदळवनाव्यतिरिक्त तसेच आरक्षाखालील क्षेत्र वजा जाता व ती जमीन वाटपास निर्बाध्यरित्या उपलब्ध असलेल्या क्षेत्रापैकी असल्याची खातरजमा करुनच कंपनीस विद्युत सब स्टेशनच्या मंजूर जागेचा आगाऊ ताबा देण्यात यावा.

३/- मे.टाटा पॉवर कंपनीला यांनी उक्त नमुद अटी व शर्ती मान्य असल्याचे रु २००/- च्या मुद्रांक कागदावर हमीपत्र सादर केल्यानंतरच जमीनीचा आगाऊ ताबा देण्यात यावा.

४/- प्रश्नाकीत जमीनीचा जमीनीचा आगाऊ ताबा देणे कामी तहसिलदार बोरीवली यांना सूचित करण्यात आले असून त्याबाबतची कार्यवाही नियमानुसार करावी.

स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही असे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

27/12/13
Issued

27/12/13

Scanned by CamScanner